वर्ष : ०५ | अंक: १५ | मुंबई, मंगळवार ५ मार्च २०१९ ते ११ मार्च २०१९ | पृष्ठ: ४

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

मूल्य २/- रुपये

POSTAL REGISTRATION NO. PLG/205/2019-2021

WeWite: www.policebatmipatra.com
www.policebatmipatra.in

# पोलीस बातमी पत्र

संपादक:- दिपक मोरेश्वर नाईक | कार्यकारी संपादक:- गुरुप्रसाद दिपक नाईक

PG 2 राज्याचे आर्थिक नियोजन बिघडले

3 → गुंतवणूकदारांना दिलासा?

धनगर समाजाला आदिवासींप्रमाणे सवलती ← 4

# माझ्या ‘आयडीयां’ना माझं सरकारच मदत करत नाही

**नागपूर - आपल्या सडेतोड भाषणासाठी ओळखले जाणारे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी आज सरकारला घरचा अहेर दिला. ‘मी नागपूर महानगरपालिकेला तसेच अन्य ठिकाणी अनेक चांगल्या आयडीया सूचवित असतो. माझ्या आयडीया फारच फॅनटास्टिक असतात. पण महानगरपालिका तर सोडाच माझ्या आयडीयांना अनेकदा माझे सरकारच मदत करीत नाही. सरकारमधील लोक बैलासारखे मान खाली घालून एकाच चाकोरीत चालतात’, असं परखड मत केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी व्यक्त केलं.**




नागपूर महापालिकेतर्फे आयोजित केलेल्या महापौर इनोव्हेशन पुरस्कार प्रदान सोहळ्या प्रसंगी गडकरी बोलत होते. कविवर्य सुरेश भट सभागृह, रेशीमबाग येथे रविवारी गडकरी यांच्या हस्ते हा पुरस्कार सोहळा पार पडला. ‘सोमवारी आपल्या देशाला इनोव्हेशन्सची खरी गरज आहे. जगातील कोणतीच गोष्ट ही टाकाऊ नसते. त्याचा उपयोग करून अनेक समस्या सोडविता येतात. नागपूर शहरातील सांडपाणी उर्जा प्रकल्पाला विकून त्यातून कोट्यावधी रुपये कमविता येतील ही संकल्पना मी मनपाला दिली. आज मनपा त्यातून तब्बल ८० कोटी रुपये कमविते आहे. इतकेच नाही जुन्या बसेसना सीएनजी लावून चालविण्याची संकल्पनासुद्धा मी त्यांना दिली. त्यातून त्यांचे सुमारे ६० कोटी रुपये वाचले आहेत. या आणि अशा अनेक संकल्पना मी मनपाला देतो. पण त्या फारशा प्रत्यक्षात उतरत नाहीत. महानगरपालिका तर सोडाच त्यांना अनेकदा माझे सरकारच मदत करीत नाही. सरकारला बैलासारखी मान खाली घालून एकाच चाकोरीत चालायची सवय लागली आहे, असं गडकरी म्हणाले.

नागपूर शहरातील समस्यांवर उपाय सूचविणाऱ्या संकल्पना महापौर इनोव्हेशन स्पर्धेत मागविण्यात आल्या होत्या. यासाठी शेकडो संकल्पना सूचविण्यात आल्या. तीन गटांमध्ये ही स्पर्धा झाली. यातील विजेत्यांना गडकरी यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला. याखेरीज पहिल्या १०० उत्तम संकल्पनांना नामांकन देण्यात आले. त्यांचा प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. रेणुका देशकर यांनी या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

### जैवइंधन भविष्य बदणार

**भारतात जैवइंधनाच्या क्षेत्रात संशोधन होण्याची आवश्यकता आहे, असे गडकरींनी यावेळी अधोरेखित केले. विविध प्रकारची जैवइंधने तयार केल्यास त्याद्वारे उर्जा आणि इंधनाची समस्या सोडविणे शक्य आहे. इतकेच नाही त्यामुळे प्रदूषणावर नियंत्रण मिळविता येऊ शकते. मी गेल्या अनेक वर्षांपासून या क्षेत्रात काम करीत आहे. सुरुवातीला माझ्या संकल्पना फारशा गांभीर्याने घेण्यात आल्या नाही. परंतु यंदा २६ जानेवारी रोजी झालेल्या हवाई प्रात्याक्षिकांमध्ये वापरण्यात आलेल्या विमानांमध्ये १०० टक्के जैवइंधनाचा वापर करण्यात आला, असे गडकरींनी यावेळी सांगितले.**




# पत्रकारांवर हल्ला केल्यास ३ वर्षे कैद

- **पत्रकारांवर वाढते हल्ले लक्षात घेऊन पत्रकार आणि प्रसारमाध्यम संस्थांना संरक्षण देणारे विधेयक अखेर महाराष्ट्र विधानसभेत शुक्रवारी मंजूर करण्यात आले आहे.**
- **यानुसार आता पत्रकार वा माध्यमानंतर हल्ला करणाऱ्यास तीन वर्षाचा कारावास किंवा ५० हजार रुपये दंड किंवा दोन्हीही, अशी शिक्षा होणार आहे.**
- **तसेच पत्रकारांवरील हल्ला दखलपात्र व अजामीनपात्र असणार आहे.**
- **महाराष्ट्र प्रसारमाध्यमांतील व्यक्ती आणि प्रसारमाध्यम संस्था (हिंसक कृत्ये व मालमत्तेचे नुकसान किंवा हानी यांना प्रतिबंध) अधिनियम, २०17 या नावाने हा कायदा अस्तित्वात येणार आहे.**
- **विधानसभेत चर्चेविना हे विधेयक मजूर करण्यात आले आहे.**
- **पालघर पोलिस अधिक्षक यांच्या विशेष पथकातील दोन अधिकाऱ्यांवर पोलिस अधिक्षकांनीच केला खंडणीचा गुन्हा दाखल**



**बोईसर** - पालघर पोलिसांचा भ्रष्टाचारात मोठ्या प्रमाणावर वाढ... बोइसर पोलिस स्टेशनच्या दोन पोलिस उपनिरीक्षकांनंतर पोलिस अधिक्षक गौरव सिंह यांच्या विशेष पथकातील अधिकाऱ्यांना खुद पोलिस अधिक्षकांनीच दाखल केला खंडणी गुन्हा दाखल, यामुळे पोलिस दलासह सर्वत्र खळबळ उडाली असून, मागील दोन वर्षापासून हया पथकातील अधिकारी त्यांच्या झिरो पोलिसांव्दारे ज्या अवैध धंद्यांवर कारवाई करण्यात येत असे त्यांना हप्त्यासाठी प्रताडि़त करत असत व त्यांना मारहाण ही करत असत. पालघर बोईसर येथिल एका व्यापाऱ्यास आशाच प्रकारे काही दिवसापूर्वी अवैध गुटखा प्रकरणी कारवाई करण्यात आली होती. यानंतर राजु दुबे या हस्तका मार्फत त्यांचाकडे ५ लाख रुपयाची मागणी करण्यात येत होती व यासाठी तगादा ही लावण्यात आला होता. या बाबत पिडीताने मा. पोलिस अधिक्षक सो पालघर गौरव सिंह यांच्याकडे तक्रार दिल्या नंतर दि. ०२ फेब्रुवारी २०१९ रोजी रात्री उशीरा या दोन अधिकारी पोलिस उपनिरीक्षक मल्हार थोरात व सहायक पोलिस उपनिरीक्षक सुरेंद्र शिवदे सह त्यांचा खाजगी हस्त राजु दुबे यांच्यावर कारवाई करण्यात आली असून, बोईसर पोलिस स्टेशन मध्ये त्यांचावर भा.द.सं.वि.कलम ३८४, ३८९, २१३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढिल

उर्वरित पृष्ठ 2 वर

# अर्थसंकल्पात ‘बेस्ट’ला ठेंगा

**मुंबई - बेस्ट उपक्रमाचा घसरलेला आर्थिक डोलारा सुधारण्यासाठी महापालिका अर्थसंकल्पात आर्थिक तरतूद करण्याची मागणी नगरसेवकांनी केली होती. मात्र आपल्या अर्थसंकल्पीय भाषणात आयुक्त अजय मेहता यांनी ‘बेस्ट’बद्दल अवाक्षरही उच्चारले नाही. त्यामुळे ‘बेस्ट’ला स्वतःच्या पायावर उभे राहण्याशिवाय पर्याय उरलेला नाही.**



बेस्ट उपक्रमाला सुमारे तीन हजार कोटी रुपयांची संचित तूट आहे. दरवर्षी वाढणारे इंधनाचे दर, सुट्या भागांच्या वाढणाऱ्या किंमती, कर्मचाऱ्यांचे वेतन त्यामुळे बेस्ट प्रशासनाला उत्पन्न व खर्चाचा मेळ बसवणे शक्य होत नाही. बेस्टची आर्थिक बाजू सावरण्यासाठी पालिकेने दोन हजार कोटी रुपयांची मदत करावी, अशी मागणी कामगार नेत्यांसह नगरसेवकांनीही लावून धरली होती. तसेच बेस्टचा अर्थसंकल्प पालिकेत विलीन करण्याचा प्रस्तावही मंजूर केला. मात्र पालिका आयुक्त बेस्टला आर्थिक मदत करण्यास तयार नाहीत. त्यामुळे त्यांनी २०१९-२० च्या अर्थसंकल्पात बेस्टसाठी ४० कोटींची केलेली तरतूद कायम राहिली आहे. अर्थसंकल्प मंजूर करण्यापुर्वी आयुक्त बेस्टसाठी काही निधी देतील, असे नगरसेवकांना अपेक्षित होते. त्यामुळे सभागृह नेत्या विशाखा राऊत यांनी बेस्टला आर्थिक मदत करण्याची मागणी लावून धरली. मात्र आयुक्तांनी अर्थसंकल्पीय भाषणात बेस्टला आर्थिक मदत करण्याबाबत कोणतीही घोषणा केली नाही.

### सेना, भाजप गप्प

बेस्टबाबत आयुक्तांच्या विरोधात सभागृहात नाराजीचे सूर उमटतील, अशी शक्यता होती. मात्र शिवसेना भाजपच्या एकाही नगरसेवकाने आयुक्तांना जाब विचारला नाही. त्यामुळे बेस्ट कामगारांसाठी येणारे आर्थिक वर्षही खडतर जाणार आहे.

### विनाअनुदानित शाळांवर तोडगा नाही

पालिकेच्या सेवेत सामावून घेण्यासाठी गेले महिनाभर आझाद मैदानात उपोषणाला बसलेल्या खासगी विनाअनुदानित शाळेतील शिक्षकांच्या प्रश्नाकडे सभागृह नेत्या विशाखा राऊत यांनी आयुक्तांचे लक्ष वेधले. आयुक्तांनी याकडेही काणाडोळा करत, यावर बोलणे टाळले. त्यामुळे विनाअनुदानित शाळांवर कोणताही तोडगा निघाला नाही.

# भाईंदर पालिकेत ३४८ पदांना मान्यता

***मीरा रोड - मीरा-भाईंदर पालिकेच्या सुधारीत आकृतीबंधास सरकारने मंजुरी दिली आहे. ३४८ नवीन पदांना मान्यता देतानाच २२९ पदे रद्दही केली आहेत. यामुळे दोन हजार ४४२ वरुन पालिकेच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांची संख्या दोन हजार ५६१ इतकी असेल. इतकेच नव्हे तर यापुढे विभागानुसार अधिकारी व कर्मचारी पालिकेला नेमावे लागणार असून आस्थापनेवरील खर्चाची असलेली ३५ टक्क्यांची मर्यादाही सरकारने शिथिल केली आहे.***

### पदाधिकाऱ्यांना कर्मचारी कसे पुरवणार?

**आकृतीबंधात कार्यालय व विभागानुसार अधिकारी, कर्मचाऱ्यांची संख्या मंजूर केली असली तरी महापौर, उपमहापौर, स्थायी समिती सभापती, सभागृह नेते, विरोधी पक्षनेते तसेच अन्य सभापती, उपसभापतींच्या कार्यालयांचा यात उल्लेख नसल्याने नेहमीच जास्तीचे अधिकारी, कर्मचारी मागणाऱ्या या पदाधिकाऱ्यांना आकृतीबंध डावलून कर्मचारी पुरवावे लागणार आहेत.**



२८ फेब्रुवारी २००२ रोजी मीरा-भाईंदर महापालिकेची स्थापना झाली. पण, १९८६ पासून २०१६ पर्यंत विविध सरकारी निर्णयानुसार दोन हजार ४४२ पदे मंजूर करण्यात आली आहेत. २०१६ मध्ये पालिकेने तयार केलेल्या आकृतीबंधात सरकारने काही सुधारणा सुचवली होती. त्यानुसार डिसेंबर २०१८ मध्ये आयुक्तांनी सरकारकडे सुधारीत आकृतीबंधाचा प्रस्ताव सादर केला होता.

सरकारने ३४८ नवीन पदांना मंजूरी देत एकवेळेची बाब म्हणून ३५ टक्के आस्थापनाची अट शिथील केली आहे, तर पालिकेचे पंडित भीमसेन जोशी रुग्णालय सरकारला हस्तांतरीत केल्याने त्यासाठी १९७ पदे, अन्ननिरीक्षकाचे एक पद व लिपीक-टंकलेखकाची ३१ पदे अशी एकूण २२९ पदे रद्द केली आहेत. अन्य पालिकेच्या आकृतीबंधाशी सुसंगत असावे, म्हणून काही पदांची नावे व वेतनश्रेणीत बदल केले आहेत.

तांत्रिक व लेखासेवेतील पदांवर प्रशासकीय सेवेतील अधिकारी, कर्मचाऱ्यांची नियुक्ती करता येणार नसल्याने पालिकेला बजावण्यात आले आहे. तर ज्या सेवाबाह्य स्त्रोतांद्वारे आवश्यक आहे, त्या करण्याचे नमूद केले आहे. नवीन मंजूर पदांमध्ये सर्वात जास्त पदे अग्निशमन दलासाठी मंजूर झाली आहेत. नव्याने पा अग्निशमन अधिकारी, १९ अग्निशमन प्रणेता, ५२ यंत्रचालक व २०३ अग्निशामक अशी एकूण २७३ पदे आहेत.

अतिरिक्त शहरअभियंता व नगररचनाकारासह पाच कार्यकारी अभियंते, चार उपअभियंते, १८ शाखा अभियंते व नऊ कनिष्ठ अभियंते अशी नवीन पदे बांधकाम, पाणीपुरवठा व नगररचना विभागासाठी मंजूर केली आहेत. माता व बालकल्याण अधिकारी, क्षयरोग अधिकारी आदी पदेही निर्माण केली आहेत.

आयुक्त व अतिरिक्त आयुक्त कार्यालयास आठ प्रभाग अधिकारी कार्यालये तसेच अन्य २८ विभागांमध्ये किती अधिकारी, कर्मचारी नेमावेत, याचा तपशील दिला आहे.

# भाईंदरमध्ये आगरी भवनाच्या प्रस्तावाला मंजुरी



**मीरा-भाईंदर शहर आगरी समाजासाठी समाज भवन होणे गरजेचे आहे यासाठी २८ फेब्रुवारी २०१९ रोजी झालेल्या मंत्रीमंडळाच्या बैठकीत आगरी समाजाला एकूण ६००० स्क्वेयर एवढी जागा देण्यात आली. यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि भारतीय जनता पार्टी चे विधायक नरेंद्र मेहता यांचे आभार व्यक्त करण्यासाठी आगरी समाज शिष्टमंडळाने विधिमंडळ येथे मुख्यमंत्र्यांची सदिच्छा भेट आणि त्यांना पुष्पगुच्छ देऊन आभार व्यक्त करण्यात आले. यावेळी मुख्यमंत्र्यांनी आगरी समाजाच्या शिष्टमंडळाला आदेशाची प्रत देण्यात आली. आणि यावेळी आगरी समाजाच्या लोकांनी विधायक नरेंद्र मेहता यांचे खास आभार व्यक्त केले.**

**भाईंदर-** मीरा-भाईंदरमध्ये आगरी भवन असावे, अशी अनेक वर्षांपासूनची आगरी समाजाची मागणी होती, त्या मागणीला मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी मिळाली आहे. मीरा-भाईंदर शहर हे प्रामुख्याने आगरी कोळी गांव आहे. आगरी समाजाच्या नागरिकांनी शहरात समाजाचे एक भवन असावे, म्हणून वारंवार मनपाकडे व विविध पक्षांकडे पत्रव्यवहार करत होते. त्या अनुषंगाने मनपाने हा ठराव महासभेत मंजुर करून राज्य शासनाच्या मंजुरीसाठी पाठवला होता. त्या ठरवाला राज्य मंत्रिमंडळाने मंजुरी दिली असल्याने मीरा-भाईंदरमध्ये आगरी भवन निर्माण होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे, असे आ. नरेंद्र मेहता यांनी सांगितले.

आगरी भवन हे भाईंदर येथील आझाद नगर परिसरात असलेल्या जागेत प्रस्तावित आहे. या जागेत उद्यान व वनिकरणाचे आरक्षण असल्याने हा आरक्षण फेरबदलाचा प्रस्ताव महासभेत मंजूर करून तो राज्य सरकारकडे मंजुरीसाठी पाठवला होता, तो प्रस्ताव शासनाने फेटाळला. त्यानंतर मनपाने पुन्हा फेब्रुवारी २०१८ मध्ये महासभेत प्रस्ताव घेऊन आगरी भावनासाठी ६००० मी. जागा देण्याबाबतच ठराव बहुमताने मंजूर करून पुन्हा मंजुरीसाठी

उर्वरित पृष्ठ 2 वर

# संपादकीय... गुंतवणूकदारांना दिलासा?



संपादकः- दिपक मोरेश्वर नाईक

**बेकायदा मुदत ठेवी स्वीकारण्यास बंदी घालणारा वटहुकूम मोदी सरकारने जारी केला असून, हा नोटाबंदीइतकाच मोठा निर्णय असल्याची चर्चा सुरू आहे. मोठ्या व्याजदराचे आमिष दाखवून गुंतवणूकदारांकडून ठेवी घेणाऱ्या नोंदणीकृत नसलेल्या संस्था वा व्यक्तींना कठोर शिक्षेची तरतूद असलेल्या या वटहुकूमामुळे अशा प्रकारच्या आर्थिक गुन्ह्यांवर नियंत्रण येईल आणि ठेवीदारांची फसवणूक थांबेल, अशी अपेक्षा आहे. महाराष्ट्रासह अनेक राज्यांत उद्योजकांनी, पतसंस्थांनी; तसेच चिट फंडांनी सर्वसामान्य गुंतवणूकदारांना कोट्यवधी रुपयांना फसविल्याच्या घटना घडल्याच्या पार्श्वभूमीवर हा वटहुकूम आणण्यात आला आहे. दोषींना एक वर्षापासून दहा वर्षांपर्यंत शिक्षेची, तसेच त्यांना दोन लाख रुपयांपासून पन्नास कोटी रुपयांपर्यंत दंड ठोठावण्याची तरतूद या अध्यादेशाद्वारे करण्यात आली आहे. त्याचबरोबर गुंतवणूकदारांचे पैसे परत देण्याबाबतही तरतूद आहे. सर्वसामान्यांच्या पैशांवर डल्ला मारणाऱ्या गुंडांवर अंकुश ठेवण्याचा या वटहुकूमाच्या मागचा हेतू अर्थातच स्तुत्य आहे; परंतु खरे आव्हान त्याच्या अंमलबजावणीचे आहे. कठोर शिक्षा करणारे अनेक कायदे आपल्याकडे आहेत. मात्र, योग्य अंमलबजावणी होत नसल्याने गुन्हेगारांना कायद्याचा धाक वाटत नाही आणि ते गुन्हे करीतच राहतात असे चित्र आहे. असे गुन्हेगार, एकूण व्यवस्था आणि राजकारणी यांचीही साखळी आपल्याकडे आहे. ही साखळीच अनेकदा कायद्याच्या अंमलबजावणीत अडसर ठरते. म्हणूनच गुन्हेगारांचे धारिष्ट्य वाढत आहे. ते कमी करायचे असेल, तर सर्व संबंधित यंत्रणांनी राजकीय हितसंबंध झुगारून पारदर्शक पद्धतीने अंमलबजावणी करायला हवी. ताजा वटहुकूम परिणामकारक करायचा असेल, तर हेच करावे लागणार आहे. हा वटहुकूम जारी केल्यानंतर अनेकांसमोर चिट फंडांद्वारे झालेल्या फसवणुकीचे दृश्य समोर आले असेल. वास्तविक चिट फंडांचे नियंत्रण करणारा १९८२चा स्वतंत्र कायदा आहे. त्याद्वारे चिट फंडांद्वारे स्वीकारल्या जाणाऱ्या ठेवी बेकायदा ठरत नाहीत. केंद्रीय अर्थ मंत्रालयानेच याबाबतचा खुलासा सोमवारी केला आहे. हा वटहुकूम केवळ बेकायदा मुदत ठेवींच्या विरोधातील असून, कंपनी, फर्म, व्यक्ती आणि चिट फंड यांचा त्यात समावेश नाही; कारण त्यांच्यासाठी स्वतंत्र कायदे आहेत, असे या खुलाशात नमूद करण्यात आले आहे. याचा दुसरा अर्थ असा, की कायदे असूनही ठेवीदारांची फसवणूक होतच आहे. कोट्यवधी रुपयांचा अपहार करून 'आता आपल्याकडे पैसे नाही,' असे सांगत गुन्हेगार काखा वर करीत आहेत. त्यांना तुरुंगात डांबले तरी ठेवीदारांना मात्र त्यांची रक्कम परत मिळत नाही, ही वस्तुस्थिती आहे. नवा वटहुकूम जारी झाल्याने या परिस्थितीत बदल पडेल काय याचे उत्तर खरे तर मिळायला हवे. अशा प्रकारचे आर्थिक गुन्हे आपल्याकडे फार पूर्वीपासून होत आले आहेत. सामान्य गुंतवणूकदारांना अधिक व्याजाचे आकर्षण असल्याने ते बँकांकडे न जाता खासगी गुंतवणूकदारांकडे वा तत्सम फंडांकडे जातात हे खरे आहे. लोकांकडून पैसे घेऊन ते चढ्या व्याजदराने इतरांना कर्जाऊ देण्याचा व्यवसाय आपल्याकडे वेगवेगळ्या प्रकारे केला जातो. बँकांचे जाळे पुरेसे न विस्तारल्याने हा व्यवसाय वाढला आहे. बँका दारातही उभे करीत नसल्याने गोरगरिबांना, कष्टकऱ्यांना दुसरा पर्यायही नसतो. त्यामुळे तेही अशा पतसंस्थांकडे, चिट फंडांकडे जातात. अशा संस्थांमध्ये हितसंबंधीय वाढले, दुष्ट प्रवृत्ती वाढली की त्या अरिष्टात सापडतात आणि पैसे नाहीत म्हणून मोकळेही होतात. त्यामुळे ही स्थिती बदलण्याची खरी गरज आहे. जनधन खात्यांद्वारे सरकारने सर्वसामान्यांना बँकांशी जोडण्याचा प्रयत्न केला असला, तरी तो पुरेसा नाही. दुसरीकडे ज्येष्ठ नागरिकांना आणि अन्य सामान्य गुंतवणूकदारांना आकर्षित करणारा व्याजदर बँकांकडून मिळत नाहीत. शेअर बाजारातील गुंतवणुकीची जोखीम ते पत्करत नाहीत. हल्ली म्युच्युअल फंडांबाबत जागरूकता होत असली, तरी त्यातही जोखीम आहेच. शिवाय बाजारातील उलथापालथीचा थेट परिणाम होत असल्याने अनेक जण त्या वाटेने जात नाहीत. अशा वेळी ते एक-दोन वाढीव टक्क्यांसाठी खासगी पतसंस्था वा चिट फंडांकडे जातात. याबाबत जागरूकता निर्माण करण्याची, अर्थसाक्षरता वाढविण्याची गरज आहे. अधिक परताव्याच्या आकर्षणापोटी संपूर्ण रक्कम गमावण्याची वेळ गुंतवणूकदारांवर येऊ नये याकरिता ठेवी स्वीकारणाऱ्यांचे अतिशय काटेकोरपणे नियमन होण्याची आवश्यकता आहे. विद्यमान कायदे आणि नवीन वटहुकूम यांद्वारे ते होऊ शकेल; परंतु त्यांची योग्य अंमलबजावणी होण्याची गरज आहे. गेल्या आठवड्यात जारी करण्यात आलेल्या वटहुकूमामुळे खासगी व्यक्तींकडून वैयक्तिक कर्ज घेता येणार नाही, अडचणीत खासगी मदतीद्वारे निधी उभारता येणार नाही, आर्थिक मदत करता येणार नाही अशी चर्चा सुरू आहे. अर्थ मंत्रालयाने याबाबत अधिक खुलासा करण्याची आवश्यकता आहे**



# संयमाचे स्वागत



सुडाचा आक्रोश देशभर घुमत असताना त्यास बळी न पडता दाखवलेल्या संयमाबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे अभिनंदन. पुलवामा घडल्यानंतर 'खून का बदला खून..' छापाची हाळी देणाऱ्यांचा अजिबात दबाव पंतप्रधानांनी घेतला नाही. या कथित राष्ट्रवादी मंडळींचे ऐकले असते तर पंतप्रधानांना पाक लष्कराविरोधातच काही कारवाई करावी लागली असती. लोकप्रियतेचे म्हणून एक दडपण येते. कारण लोकच आपल्या नेत्याने कसे वागायला हवे हे ठरवू लागतात. समाजमाध्यमांतून तर अशांचा हैदोस पुलवामा हत्याकांड घडल्यापासूनच सुरू होता. पुलवामात केंद्रीय पोलीस दलांचे तब्बल ४० जवान मारले गेले. हे कृत्य केले ते पाकिस्तानच्या आश्रयाने फोफावलेल्या जैश-ए-महंमद या दहशतवादी संघटनेने. पाकिस्तानच्या आश्रयाने याचा अर्थ पाकिस्तानी लष्कर आणि गुप्तहेर यंत्रणा आयएसआय यांच्या आश्रयाने. आपल्या शेजारी देशाच्या नाडय़ा या दोघांच्या हातात असतात. तेव्हा त्यांच्या पाठिंब्यावर फोफावलेल्या दहशतवादी संघटनेने भारतीय भूमीत येऊन वारंवार इतका हाहाकार उडवल्यानंतर 'इंद्राय स्वाहा.. तक्षकाय स्वाहा..' या वृत्तीने भारताने पाकिस्तानी लष्कराविरोधातच काही कारवाई करायला हवी अशी भाषा सुरक्षित वातावरणात राहून देशास युद्धाची हाक देणारे स्वघोषित राष्ट्रप्रेमी करू लागले होते. त्यांच्या मते पाकिस्तानी लष्करालाच धडा शिकविण्याची वेळ येऊन ठेपली असून भारताने आताच काय ती तातडीने कारवाई करून आपले शौर्य दाखवून द्यायला हवे. तथापि पंतप्रधान मोदी यांनी या प्रचाराच्या दबावाखाली न येता जैश-ए-महंमद या संघटनेच्या प्रशिक्षण केंद्रांवर तेवढी कारवाई केली म्हणून ते अभिनंदनास पात्र ठरतात. यामुळे स्वघोषित राष्ट्रप्रेमींचा कदाचित हिरमोड होईल. पण त्यास इलाज नाही.

भारत सरकारचे परराष्ट्र सचिव विजय गोखले यांनी दिलेल्या अधिकृत माहितीनुसार भारतीय विमानांनी मंगळवारी पहाटे जी कारवाई केली ती 'बिगर-लष्करी प्रतिबंधात्मक' अशा स्वरूपाची होती. याचा अर्थ आपण जे काही केले ते लष्करी कारवाईच्या रूपात नव्हते. याचा अर्थ उरी घडल्यानंतर ज्या प्रकारचे लक्ष्यभेदी हल्ले आपल्या लष्कराने केले त्या प्रकारची ही कारवाई नव्हती. त्या लक्ष्यभेदी हल्यांनतर भारतीय लष्कराने केलेल्या कारवाईची माहिती देण्यासाठी लष्कर प्रमुख जातीने हजर होते. मंगळवारची कारवाई हवाई दलाने केली. पण त्याची माहिती दिली ती मात्र परराष्ट्र सचिवांनी. ही बाबदेखील पुरेशी बोलकी ठरते. भारत सरकारने सविस्तर खुलासा केला ते बरे झाले. कारण त्याअभावी या कारवाईबाबत वाटेल त्या वदंता उठल्या होत्या आणि किती ठिकाणी कारवाई केली गेली त्याचे छातीठोक चित्रप्रदर्शनही सुरू झाले होते. वास्तव तसे नाही. मंगळवारच्या कारवाईत बालाकोट या एका ठिकाणालाच लक्ष्य करण्यात आले होते. भारतीय विमानांनी अवघ्या ९० सेकंदांत, म्हणजे दीड मिनिटांत ही कारवाई केली. ही जागा पाकव्याप्त काश्मीरपासून ८० किमीच्या अंतरावर आहे. पण तेथे मारगिरी करण्यासाठी आपली विमाने पाकव्याप्त काश्मिरात गेली, पण त्यांना पाकिस्तानी हवाई हद्दीचा भंग करावा लागला नाही. तसे केले असते तर ती वेगळीच आगळीक गणली असती. आपल्या विमानांनी दोन देशांच्या सीमांतील मधल्या प्रदेशातून पाकिस्तानात मारगिरी केली. त्यामुळे आपण कायदेशीर अर्थाने पाकिस्तान हद्दीत घुसलो असे म्हणता येणार नाही. आंतरराष्ट्रीय मुत्सद्देगिरीच्या अनुषंगाने ही बाब फारच महत्त्वाची. तसेच आपण या कारवाईचे वर्णन बिगर-लष्करी प्रतिबंधात्मक असे केले आहे.

ही बाबदेखील लक्षणीय म्हणावी लागेल. ही कारवाई लष्करी अशी गणली गेली असती तर पाक सन्यास आपणास लक्ष्य करण्याची भाषा- वा कृती- करण्यास वाव राहिला असता. आपण तसे केलेले नाही. पाकिस्तानी सुरक्षा दल वा पाक आस्थापने यांतील कशालाही आपण हात लावलेला नाही. आपण कारवाई केली ती बालाकोट पर्वतावरील लष्कर-ए-तय्यबा आणि जैश-ए-महंमद या दहशतवादी संघटनांच्या प्रशिक्षण केंद्रांवर. ही अशी प्रशिक्षण केंद्रे तेथे होती ही बाब पाकिस्तान अधिकृतपणे कदापिही मान्य करणार नाही. तशी ती केली तर दहशतवादास अधिकृतपणे फूस असल्याचा पाकिस्तानवरील आरोप त्या देशास मान्यच होईल. तेव्हा पाकिस्तानची ही अडचण ओळखूनच आपण आपल्या लक्ष्याची निवड केली. तेथे शेकडो प्रशिक्षणार्थी दहशतवादी होते असे म्हणतात. ही जागा घनदाट जंगलात आहे असे आपल्या परराष्ट्रमंत्र्यांनीच सांगितले. त्यामुळे प्रत्यक्षात तेथे किती दहशतवादी टिपले गेले याचा तपशील उपलब्ध झालेला नाही. त्यासाठी काही काळ वाट पाहावी लागेल. तसेच ती जागा किती ध्वस्त झाली हा तपशीलही उपलब्ध होण्यास वेळ लागेल. पण त्यामुळे या कारवाईच्या परिणामकारकतेवर प्रश्न निर्माण होणार नाही.

ही अशी कारवाई केली जाणार अशी अटकळ जवळपास सर्वांनीच बांधली होती. विशेषत ज्या निर्घृणपणे पुलवामाकांड घडले ते पाहता भारतास प्रत्युत्तर देणे भाग होते. ते तसे दिले जाईल याची हमी खुद्द पंतप्रधानांनीच दिली. तेव्हा पुढील आठवडय़ात निवडणुका जाहीर व्हायच्या आत भारतास काही करून दाखवावेच लागणार हे उघड होते. हे काही करणे म्हणजे किती करणे हाच काय तो प्रश्न होता. त्याचे उत्तर आज मिळाले. आजच्या कारवाईत जैश-ए-महंमदचा म्होरक्या मसूद याचे काही जवळचे नातेवाईकही मारले गेल्याचे समोर येते. हे खरे असले तरी या तपशिलास तसा काही अर्थ नाही. याचे कारण याआधी जम्मू-काश्मिरातही या मसूदचा पुतण्या आदी नातलग मारले गेलेच आहेत. तेव्हा मंगळवारच्या कारवाईत आणखी काही नातेवाईक मारले गेल्याने जैशच्या हालचालींस काही खीळ बसेल असे मानण्याचे काहीच कारण नाही. हे सर्व अतिरेकी मरणाच्या तयारीनेच दहशतवादाच्या मदानात उतरलेले आहेत. आणि जो मरावयास तयार असतो त्यास परावृत्त करणे अवघड असते आणि जगातील अनेक देशांना ते साध्य झालेले नाही. तेव्हा आपणासही अशा एका कारवाईत हे जमेल असे समजण्याचे कारण नाही.

त्याचमुळे ही कारवाई हा पूर्णविराम नाही. जैश वा अन्य कोणाचा कायमचा बीमोड करावा असाही तिचा हेतू नव्हता. असू शकत नाही. तर एक प्रकारची जरब बसवणे आणि आपण काय करू शकतो याची जाणीव करून देणे हेच या कारवाईचे उद्दिष्ट होते. हे समजून घेण्यासाठी चीनचे उदाहरण रास्त ठरावे. चीनने १९६२ साली भाराताविरोधात जे काही केले त्यामुळे त्या देशाबाबत आपल्या मनात कायमच साशंकतेची भावना राहिलेली आहे. इतक्या वर्षांनंतर अजूनही चीनबाबत संशयाचे जोखड अद्याप आपणास फेकून देता आलेले नाही. आधुनिक युद्ध हे रणापेक्षा मनांत लढले जाते. त्यामुळे शत्रूच्या मनात साशंकता निर्माण करणे अत्यावश्यक असते. त्यासाठी प्रत्यक्ष युद्धच करावे लागते असे नाही. ते करण्याची क्षमता निर्माण करणे आणि प्रतिपक्ष काय करेल याच्या अंदाजात त्यांस गुंगवून ठेवणे अधिक गरजेचे.

सूड, बदला वगरे भावना या मुत्सद्देगिरीच्या पहिल्या पायरीवर असतात. तेथून पुढे जाणे हे सामान्य भक्तांना अशक्य असेल. पण ज्यास नेतृत्व करावयाचे आहे त्याच्याकडे पुढे जाण्याची क्षमता हवीच हवी. ''सुडाची भावना प्रामुख्याने अशक्त व्यक्त करतात,'' असे आईन्स्टाईन म्हणत असे. ते सत्य आहे. म्हणून या सूडभावनेच्या दबावास बळी न पडता भारत सरकारने केलेल्या संयत कृतीचे महत्त्व.

## नवी मुंबई महापालिका कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोग लागू

**नवी मुंबई –** नवी मुंबई पालिका सेवेतील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना महापालिकेच्या माध्यमातून सातवा वेतन आयोग लागू करण्यात आला आहे. बुधवारी २७ फेब्रुवारी रोजी झालेल्या महासभेत याबाबतचा प्रस्ताव मंजूर करण्यात आला. या कर्मचाऱ्यांप्रमाणे नवी मुंबई परिवहन सेवेतील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना देखील सातवा वेतन आयोग लागू करण्याबरोबरच कंत्राटी, ठोक आणि रोजंदारी तत्त्वावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना वेतनवाढ करण्यात यावी, अशी मागणी लोकप्रतिनिधींनी केली.

नवी मुंबई महापालिकेच्या सेवेत सुमारे २२०० कायमस्वरूपी कर्मचारी असून सुमारे साडेसहा हजार कंत्राटी आणि ठोक कामगार आहेत. २०१६ पासून लागू झालेल्या सातव्या वेतन आयोगानुसार सध्याच्या वेतनावर सुमारे ४० टक्के वाढ मिळणार असून वेतनासोबतच फरकाची रक्कमही कर्मचाऱ्यांना मिळणार आहे. यापुढे वेतनापोटी पालिकेला २३० कोटींऐवजी ३२२ कोटी रु पये खर्च येणार आहे. या वेळी पालिका अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना न्याय देताना कंत्राटी, ठोक मानधन आणि परिवहन सेवेत काम करणाऱ्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर अन्याय होऊ नये अशी मागणी करीत या कर्मचाऱ्यांना देखील सातवा वेतन आयोग लागू करावा, अशी मागणी लोकप्रतिनिधींनी केली. सदस्यांच्या चर्चेनंतर महापौर जयवंत सुतार यांनी सदस्यांनी केलेल्या सूचनांची दखल प्रशासनाने घेण्याचे आदेश देत प्रस्ताव सूचनांसह मंजूर केला.

## मीरा-भाईंदरमधील शाळांची सुरक्षा वाऱ्यावर

**भाईंदर : मीरा-भाईंदर शहरातील खासगी शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची सुरक्षा लक्षात घेऊन खासगी शाळांना त्यांच्या इमारतीचे संरचनात्मक लेखापरीक्षण (स्ट्रक्चरल ऑडीट) करणे बंधनकारक करण्याचा निर्णय महापालिकेने गेल्या वर्षी घेतला होता. परंतु या निर्णयाची माहिती अनेक शाळांपर्यंत पोहोचलीच नसल्याने बहुतांश शाळांचे लेखापरीक्षण करण्यातच आलेले नाही.**

विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी शाळांमधून अग्निशन यंत्रणा बसवणे सक्तीचे केल्यानंतर महापालिकेने गेल्यावर्षी मे महिन्यात शाळा इमारतींचे संरचनात्मक तपासणी करणे बंधनकारक करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार महापालिकेच्या सार्वजनिक बांधकाम विभागाने याबाबतच्या नोटीसा तयार करून त्या शिक्षण विभागाकडे दिल्या. शहरातील सर्व शाळांची माहिती शिक्षण विभागाकडे असल्याने या विभागाकडून नोटिसा शाळांना देणे अपेक्षित होते. परंतु शिक्षण विभागाच्या ढिसाळ



कारभारामुळे सर्व शाळांना नोटिसा देण्यात आल्या नाहीत. नोटिसा गेल्या वर्षी मे महिन्यात तयार करण्यात आल्या असतानाही काही शाळांना त्या यावर्षी जानेवारी महिन्यात देण्यात आल्या आहेत. काही शाळांच्या संचालकांना चक्क व्हॉट्स ॲपवर नोटिसा पाठवण्यात आल्या असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

परिणामी शहरात दीडशेहून अधिक खासगी शाळा असतानाही अनेक शाळांनी लेखापरीक्षण करवून घेतलेच नसल्याचे समोर आले आहे. आतापर्यंत महापालिकेच्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडे केवळ २० शाळांनीच संरचनात्मक लेखापरीक्षण केल्याचे अहवाल सादर केले आहेत. त्यामुळे इतर शाळांमधील विद्यार्थ्यांची सुरक्षा वाऱ्यावर असल्याचे स्पष्ट झाले आहे.

शहरातील धोकादायक स्थितीत असलेल्या इमारतींचे संरचात्मक लेखापरीक्षण करण्यासाठी महापालिकेने खासगी अभियंत्याचे पथक स्थापन केले आहे. पथकातील अभियंत्यांकडूनच लेखापरीक्षण करणे आवश्यक आहे. शाळांना या पथकातील अभियंत्यांची यादी नोटिशीसोबत देण्यात आली आहे. परंतु शहरातील खासगी शाळांपैकी किती शाळांना नोटिसा देण्यात आल्या, त्याची माहिती शिक्षण विभागाकडे उपलब्ध नाही. दुसरीकडे महापालिकेने नेमलेल्या अभियंत्यांकडून लेखापरीक्षण करवून घेणे आर्थिकदृष्टय़ा परवडणारे नाही, अशी माहिती काही छोटय़ा स्वरुपाच्या खासगी शिक्षण संस्थाचालकांनी दिली. काही शाळांनी स्वत:च खासगी अभियंत्यांकडून लेखापरीक्षण अगोदरच करवून घेतले आहे. त्यामुळे या लेखापरीक्षणाचा अहवाल महापालिकेने स्वीकारावा, अशी मागणी शाळाचालकांची आहे.

## वैतरणा खाडीमध्ये रेतीमाफियांना दणका

**मनोर :** महसूल प्रशासन आणि पोलिसांनी केलेल्या संयुक्त कारवाईत वैतरणा खाडी पात्रात अवैध रेती उत्खनन करणाऱ्या दोन फायबर बोटी आणि एक सक्शन मशीन जप्त करण्यात आली. हलोली यथे वैतरणा खाडी हालोली व बहाडोली रेती बंदरावर ही कारवाई करण्यात आली.

मंगळवारी झालेल्या कारवाईची प्रक्रीया लांबल्याने अंधार पडला. जप्त करण्यात आलेल्या फायबर आणि सक्शन मशीन असलेल्या दोन्ही ठिकाणी पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. बुधवारी पहाटेच्या अंधारात हालोली रेती बंदरात पोलिसांच्या बंदोबस्तात ठेवलेली फायबर माफियांनी पळवून नेली. नौका ताब्यातून पळवल्याचे कळताच पोलिसांची धावपळ उडाली. सकाळपासून सर्च अभियान राबविल्यानंतर गिराळे रेती बंदरात पळवलेली फायबर बोट आढळून आली. जप्त करण्यात आलेली सक्शन मशीन आणि फायबर बोट गॅस कटरने नष्ट करण्यात येणार असल्याची माहिती सूत्रांकडून मिळाली.

पोलीस बंदोबस्तात जप्त करून ठेवण्यात आलेली नौका पळवून नेण्यापर्यंत रेतीमाफियांची मजल गेल्याने पोलिस यंत्रणेचा धाक संपल्याचे काहींनी



सांगितले. याप्रकरणी मनोर पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला. वन विभागाच्या स्पीड बोटीने मनोरच्या पोलीस स्टेशनच्या प्रभारी अधिकारी सिद्धवा जायभाये, सफाळे पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी, तलाठी नितीन सुर्वे आणि मनोर पोलीस स्टेशनचे कर्मचारी यांनी कारवाई केली.

## मुंबईतील रेल्वे स्थानके असुरक्षितच!

**ठाणे :** जम्मू-काश्मीरमधील पुलवामा येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारत-पाकिस्तानमध्ये वाढलेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर राज्यातील रेल्वे स्थानकांवर अतिदक्षतेचा इशारा देण्यात आला आहे. मात्र, ठाणे पट्टय़ातील बहुतांश रेल्वे स्थानके सुरक्षेच्या बाबतीत 'रामभरोसे' असल्याचे चित्र आहे. या रेल्वेस्थानकांत बसवण्यात आलेली धातूशोधक यंत्रे आणि सामान तपासणी यंत्रे धूळ खात पडून राहिली आहेत. रेल्वे सुरक्षा बल (आरएसपी) आणि रेल्वे पोलिसांचीही गस्त नियमितपणे होत नसल्याचे प्रवाशांचे म्हणणे आहे.

मुंबईवर झालेल्या '२६/११'च्या दहशतवादी हल्ल्यानंतर मध्य रेल्वेच्या महत्त्वाच्या रेल्वे स्थानकांत धातूशोधक यंत्रे (मेटल डिटेक्टर) आणि सामान तपासणी यंत्रे (बॅगेज स्कॅनर) बसवण्यात आली. या यंत्रांच्या देखभालीची जबाबदारी मध्य रेल्वेच्या सिग्नल आणि टेलिकॉम यंत्रणा विभागाकडे असते. सुरुवातीच्या काळात या यंत्रांचा व्यवस्थित वापर होत होता. परंतु, मुंबई हल्ल्याच्या झळा कमी झाल्यानंतर ही यंत्रे वापराविना धूळखात पडू लागली आहेत. या यंत्रांमध्ये बिघाड झाल्याने आता ठाणे स्थानकातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी विभागीय रेल्वे व्यवस्थापकांना (डीआरएम) पत्र पाठवून ही यंत्रे तातडीने दुरुस्त करण्याची तसेच ठाणे स्थानकाच्या सुरक्षेत वाढ करण्याची मागणी केली आहे.

## कल्याण-डोंबिवलीतील वाहतूककोंडी सुटणार

कोंडीत गुदमरलेल्या कल्याण, डोंबिवली शहरांना मोकळा श्वास घेता यावा यासाठी स्थायी समितीने कल्याण, डोंबिवलीच्या विकास आराखडय़ात प्रस्तावित पाच रस्ते आणि ठाकुर्ली येथे आणखी एका पुलाची उभारणी करण्याचा प्रस्ताव पुढे आणला आहे. नवीन रस्ते बांधणीला अर्थसंकल्पात प्राधान्य देण्यात आले आहे.

शिळफाटा रस्त्यावर पलावा चौक, काटई नाका, मानपाडा चौक येथे वाहतूक कोंडी होते. कल्याण, डोंबिवली, बदलापूर, अंबरनाथ परिसरातील आणि भिवंडीकडे ये-जा करणारी वाहने एकाच वेळी शिळफाटा रस्त्यावर येत असल्याने वाहतूक कोंडीत भर पडते.

स्थायी समितीने डोंबिवलीतील संदप- आगासन ते बेतवडे हा 'एमएमआरडीए'च्या विकास आराखडय़ात प्रस्तावित ३० मीटरचा रस्ता बांधण्याचा निर्णय घेतला आहे. ठाणे पालिका हद्दीतील भारत गिअर (मुंब्रा) ते बेतवडे हा ३० मीटरचा रस्ता बांधण्याचा निर्णय ठाणे पालिकेने घेऊन या कामासाठी ठेकेदारही नियुक्त केला आहे. ठाणे पालिका अधिकाऱ्यांशी चर्चा करून ठाण्याकडून बेतवडेकडे येणारा आणि डोंबिवलीतील संदपकडून बेतवडेकडे जाणारा रस्ता एका जोडण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. डोंबिवलीतील प्रवासी शिळफाटा येथे न जाता संदप-बेतवडे ते भारत गिअर (मुंब्रा) नवीन रस्त्याने



निघून जातील. ठाण्याकडून येणारे भारत गिअर बेतवडे रस्त्याने संदप येथून डोंबिवलीत जातील व कोंडी घटेल, असे सभापती दीपेश म्हात्रे यांनी सांगितले. आगासन येथील पूल रेल्वेच्या सहकार्याने उभारला जाईल. शिळफाटय़ावरील कोंडी सोडविण्यास हा रस्ता महत्त्वपूर्ण ठरेल.

## वसई-विरार महापालिकेत योजनांची रखडपट्टी

### *महापालिकेच्या अनेक योजना सात वर्षांपासून प्रलंबित*

**वसई :** वसई-विरार महापालिकेच्या अनेक योजना गेल्या सात वर्षांपासून प्रलंबित आहेत. त्यात रो रो सेवा, वस्तूसंग्रहालय, बहुमजली वाहनतळ आदींचा समावेश आहे. तांत्रिक आणि कायदेशीर अडचणींमुळे या योजना रखडल्या होत्या. आता त्या अंतिम टप्प्यात असून या वर्षांत त्या पूर्ण होतील, असा दावा पालिकेने केला आहे. शहराच्या विकासासाठी महापालिकेने अनेक योजना आखल्या होत्या. मागील सात वर्षांपासून या सर्व योजना आणि निर्णय अर्थसंकल्पात प्रस्तावित करण्यात येत होते. त्यासाठी तरतूद करण्यात येत होती. परंतु त्याची अंमलबजावणी झालेली नाही. आता २०१९- २० या आर्थिक वर्षासाठी तयार करण्यात आलेल्या अर्थसंकल्पात पुन्हा या योजनांचा समावेश करण्यात आला आहे. या सर्व योजना आतापर्यंत कागदावरच राहिल्या आहेत. त्यांची पूर्तता झालेली नाही, प्रकल्प कार्यान्वित झालेले नाहीत. मग पुन्हा हे प्रकल्पा दिशाभूल करण्यासाठी आणले का, असा सवाल शिवसेनेच्या गटनेत्या किरण चेंदवणकर यांनी सभागृहात केला.

महापालिकेने मात्र या तांत्रिक अडचणींमुळे या योजनांची पूर्तता यापूर्वी झाली नसल्याचे सांगितले. योजनांचा आराखडा तयार आहे.





त्यामुळे त्याची तरतूद आम्ही अर्थसंकल्पात केली होती, असे स्थायी समिती सभापती सुदेश चौधरी यांनी सांगितले. रो रो सेवा हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प होता. त्याला सागरी किनारा नियंत्रण क्षेत्र कायद्याची अडचण आली होती. त्यामुळे तो रखडला होता. आता त्याच्या अटी शिथिल झाल्याने तो प्रकल्प पूर्ण करण्यात येणार आहे, असे ते म्हणाले. वसईतील सर्व समाजाच्या पारंपारिक वस्तू, अवजारे, वसईच्या संस्कृतीची अवशेष संग्रहित करण्यात आली असून त्याचे वस्तुसंग्रहालय केले जाणार आहे. बहुजमली वाहनतळासाठी खाजगी जागा भूसंपादन करण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे, असे ते म्हणाले. त्यामुळे हा प्रकल्पही या वर्षांत कार्यान्वित होणार आहे. मोबाइल मनोऱ्याचे धोरण राबवण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. सर्व मनोऱ्यांचे सर्वेक्षण झाले असून त्यांना शास्तीसह शुल्क आकारले जाणार आहे. येत्या एक दोन दिवसांतच ही प्रक्रिया सुरू केली जाणार असल्याची माहितीही त्यांनी दिली.

शहरातील सर्व निवासी आणि वाणिज्यविषयक इमारतींचे लेखापरीक्षण करण्याची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती अग्निशमन विभागाने दिली. यासाठी नोटिसा बजावण्यात आल्याचे अग्निशमन विभागाने सांगितले.

# पाकिस्तानने जबरदस्ती व्हिडीओ रेकॉर्ड करायला लावल्याने अभिनंदन यांना झाला उशीर

**नवी दिल्ली- शक्य तितकी दिरंगाई करीत पाकिस्तानने भारतीय वायुदलाचे विंग कमांडर अभिनंदन वर्धमान यांची शुक्रवारी रात्री सुटका केली. पंजाबातील वाघा सीमेवर त्यांना भारतीय अधिकाऱ्यांच्या ताब्यात देण्यात आले. रात्री ९ वाजून २० मिनिटांनी अभिनंदन यांनी मायभुमीत प्रवेश केला. अभिनंदन यांच्या सुटकेला जवळपास तीन तास उशीर झाला. भारतात पोहोचताच अभिनंदन यांना तातडीने त्यांना मोटारींच्या ताफ्यातून अज्ञात स्थळी नेण्यात आले.**

पीटीआयने दिलेल्या वृत्तानुसार, पाकिस्तानी अधिकाऱ्यांनी अभिनंदन यांना सीमारेषा पार करण्यासाआधी व्हिडीओ रेकॉर्ड करायला लावल्यानेच दिरंगाई झाली. हा व्हिडीओ रेकॉर्ड केल्यानंतर पाकिस्तानी सरकारने लगेचच रात्री ९ वाजता मीडियासाठी तो रिलीजही केला. या व्हिडीओत अभिनंद आपण टार्गेट शोधण्यासाठी नियंत्रण रेषा पार केली होती, मात्र आपलं लढाऊ विमान कोसळलं असं सांगत आहेत. 'पाकिस्तानी लष्कराच्या जवानांनी मला गर्दीपासून वाचवलं. पाकिस्तानी लष्कर अत्यंत शिस्तबद्ध असून आपण खूपच प्रभावित झालो आहोत', असं अभिनंदन यांनी व्हिडीओत म्हटलं आहे. हा व्हिडीओ एडीट करण्यात आला आहे असं दिसत आहे. कारण यामध्ये १५ कट आहेत. भारतीय हवाई हद्दीत घुसलेल्या एका पाकिस्तानी विमानाचा



वेध घेत असताना त्यांचे मिग विमान अपघातग्रस्त होऊन २७ फेब्रुवारीला पाकिस्तानच्या हद्दीत कोसळले होते. त्यावेळी पॅराशूटद्वारे उतरत असलेल्या अभिनंदनला पाकिस्तानने अटक केली होती. त्यानंतर त्यांच्या दोन चित्रफितीही पाकिस्तानने जारी केल्या होत्या. त्यात त्यांना मारहाण झाल्याच्या खुणाही जाणवत होत्या. भारताने या चित्रफितींना जोरदार आक्षेप घेत, जीनिव्हा करारानुसार अभिनंदन यांना भारताच्या हवाली करावे, अशी मागणी केली होती. अमेरिका, सौदी अरेबिया आणि चीननेही पाकिस्तानवर दबाव आणल्यानंतर पाकिस्तानने त्यांच्या सुटकेची घोषणा केली होती.

अर्थात हे शांततेच्या दिशेने पाकिस्तानने टाकलेले पहिले पाऊल आहे, अशी बतावणी पाकिस्तानचे पंतप्रधान इम्रान खान यांनी केली होती. तसेच भारताकडे चर्चेचा प्रस्ताव ठेवला होता. आधी अतिरेकी गटांवर ठोस कारवाई करा, मगच चर्चेचा विचार करू, असे भारताने त्यांना ठणकावले होते. त्यानंतर गेले दोन दिवस अभिनंदन यांच्या सुटकेकडे देशाचे लक्ष लागले होते.

शुक्रवारी दुपारी बारा वाजता अटारी सीमेवरून ते मातृभूमीवर पाऊल ठेवतील, असे आधी जाहीर झाले होते, त्यामुळे सकाळपासूनच या सीमेवर प्रसिद्धी माध्यमांचे प्रतिनिधी, वृत्तवाहिन्यांचे वार्ताहर, सेनादलांचे तसेच प्रशासकीय विभागांचे अधिकारी आणि हजारो नागरिक जमले होते.

# धनगर समाजाला आदिवासींप्रमाणे सवलती

**मुंबई-** धनगर समाजाला आदिवासी समाजाचे राजकीय आणि शैक्षणिक आरक्षण देण्याचा अधिकार नसल्याचे वास्तव राज्य सरकारने स्वीकारले आहे. मात्र, लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आदिवासी समाजाला असलेले सर्व प्रकारचे आर्थिक



लाभ धनगर समाजाला देऊन गोंजारण्यासाठी राज्य सरकार लवकरच मोठी घोषणा करणार आहे. निवडणुकीच्या तोंडावर धनगर समाजाला नाराज करता येणार नसल्याने अखेर आदिवासींचे आर्थिक लाभ दिले जाणार असले, तरी धनगरांना राजकीय, शैक्षणिक आणि नोकऱ्यांमध्ये आदिवासींचे आरक्षण मिळणार नाही. धनगर समाजाला आदिवासींचे आरक्षण देण्याचा अधिकार राज्य सरकारला नसल्याने या समाजाला झुलवत ठेवण्यापेक्षा सुरुवातीला आर्थिक लाभ देऊन न्यायालयीन पातळीवर आणि केंद्र सरकारच्या पातळीवर हे आरक्षण मिळवण्याचा प्रयत्न करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. सद्यस्थितीत हाच मध्यम मार्ग असल्याने धनगर समाजाच्या नेत्यांनीही हा निर्णय मान्य करावा यासाठी सरकारच्या पातळीवरून ज्येष्ठ नेते चंद्रकांत पाटील प्रयत्न करत आहेत. आदिवासींना घटनेने दिलेल्या प्रमुख अधिकारांमध्ये अॅट्रॉसिटी अॅक्ट (अनुसूचित जाती जमाती प्रतिबंधक कायदा), राखीव मतदारसंघ, लाभ घेण्यासाठी उत्पन्नाची मर्यादा नसण्यासारख्या विशेष सवलती आहेत. त्या मिळाव्यात यासाठी धनगर समाज प्रयत्नात होता; मात्र या सवलती मिळवण्यासाठी त्यांना अजून लढा उभारावा लागणार आहे.

टाटा इन्स्टिट्युट ऑफ सोशल सायन्स (टीस) यांनी धनगर समाजाचा दिलेला अहवाल आणि या समाजाच्या मागण्यांबाबत निर्णय घेण्यासाठी मंत्रिमंडळ उपसमिती गठीत करण्यात आली आहे. या उपसमितीमध्ये चंद्रकांत पाटील, सुभाष देसाई, प्रा. राम शिंदे, महादेव जानकर, पंकजा मुंडे, विष्णू सवरा, एकनाथ शिंदे, राजकुमार बडोले आणि संभाजी पाटील-निलंगेकर या सदस्यांचा समावेश आहे. राज्यामध्ये धनगर समाजाचा भटक्या-विमुक्त समाजात समावेश आहे. भटक्या-विमुक्तांमध्ये धनगरांना साडेतीन टक्के आरक्षण राज्यामध्ये लागू आहे. आदिवासी जमातीत असलेले धनगड ही जमात म्हणजेच धनगर असल्याने आदिवासींचे आरक्षण मिळावे ही धनगर समाजाची मागणी आहे.

# सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता करणाऱ्यांनी पुणे पालिकेला केले मालामाल


**पुणे-** सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता पसरविणाऱ्या नागरिकांवर पुणे महानगरपालिकेकडून कडक कारवाई करण्यात येत आहे. सुरुवातील रस्त्यावर थुंकणाऱ्यांकडून दंडासोबतच रस्ता साफ करुन घेतला जात होता. नोव्हेंबरपासून आजपर्यंत महापालिकेने तब्बल २३ लाख ३९ हजार रुपयांचा दंड नागरिकांकडून वसूल केला आहे. त्यामुळे सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता करणाऱ्यांनी पालिकेला चांगलेच मालामाल केले आहे. सार्वजनिक ठिकाणी थुंकणाऱ्या, लघवी करणाऱ्या तसेच कचरा फेकणाऱ्यांवर महापालिकेकडून कारवाई करण्यात येत आहे. नोव्हेंबरपासून ही कारवाई करण्यात येत असून २ मार्चपर्यंत तब्बल ९ हजार सातशे १ नागरिकांवर कारवाई करण्यात आली आहे. त्यांच्याकडून २३ लाख ३९ हजार दोनशे ९१ इतका दंड वसूल करण्यात आला आहे. यात सर्वाधिक कारवाई ही



सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकणाऱ्या नागरिकांवर करण्यात आली आहे. सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकणाऱ्या ८ हजार तिनशे १६ लोकांवर कारवाई करण्यात आली असून त्यांच्याकडून २१ लाख ४६ हजार पाचशे ८१ रुपये इतका दंड वसूल करण्यात आला आहे. त्याखालोखाल सार्वजनिक ठिकाणी थुंकणाऱ्यांची संख्या असून १ हजार दोनशे ३२ नागरिकांकडून १ लाख ६३ हजार आठशे ६० रुपये इतका दंड वसूल करण्यात आला आहे. सार्वजनिक ठिकाणी लघवी आणि सौचास बसणाऱ्यांकडून अनुक्रमे २४ हजार पाचशे ५५ आणि ४ हजार दोनशे ९५ इतका दंड वसूल करण्यात आला आहे.

# विजय मल्या भारतात कधी परतणार?

**मुंबई-** विजय मल्या भारतात कधी परतणार? आणि कायदेशीर सुनावणीला कधी सामोरे जाणार? असा प्रश्न उच्च न्यायालयाने उपस्थित केला. फरार आर्थिक गुन्हेगार (फ्युगेटिव्ह इकॉनॉमिक ऑफेन्डर अॅक्ट - एफईओए) या कायद्यानुसार विजय मल्याला सक्तवसुली संचालनालयाच्या (ईडी) विशेष न्यायालयाने ५ जानेवारीला फरार घोषित केले आहे. त्या निर्णयाविरोधात मल्याने उच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेवर न्या. इंद्रजित मोहंती आणि न्या. सारंग कोटवाल यांच्या खंडपीठासमोर शुक्रवारी सुनावणी झाली. मल्या यांना भारतात येण्याची इच्छा आहे; पण ब्रिटिश न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार त्यांना परवानगीशिवाय ब्रिटन सोडता येणार नाही,



असा युक्तिवाद त्याच्या वकिलांनी केला. मल्याला फरार घोषित करणे आणि एफईओएअंतर्गत त्यांची मालमत्ता जप्त केल्याने त्यांना कर्ज देणाऱ्यांचेच नुकसान होणार आहे, असा युक्तिवाद मल्याच्यावतीने वकील अमित देसाई यांनी केला. बँकांकडून घेतलेले कर्ज परत करण्याची तयारी मल्या यांनी दाखविली आहे, असेही त्यांनी खंडपीठाच्या निदर्शनाला आणून दिले. त्यामुळे मल्या यांना फरार घोषित करणे दुराग्रही आहे, असा दावाही देसाई यांनी केला. मल्या भारतात परत आले आणि सुनावणीला उपस्थित झाले की, हा ठपका आपोआपच हटेल, नव्या कायद्यान्वये त्यांची जप्त केलेली मालमत्ताही सोडविली जाईल. त्यामुळे मल्या कधी परतणार, हे सांगा असे खंडपीठाने म्हटले.

# जल्लादाच्या २ पदांसाठी चक्क १०० जणांचे अर्ज

**कोलंबो-** कुठल्याही जेलमध्ये एखाद्या कैद्याला फाशी देण्याचे काम हे जल्लादच करतो हे काही आपल्या नवीन सांगायला नको. पण तुम्हाला कोणी सांगितले जल्लाद पदासाठी भरती निघाली आहे. तर आपला पहिला नकारच असले, बरोबरच आहे कुणालाही जल्लादचे काम करायला आवडणार नाही. पण याउलट चित्र सध्या आपल्या शेजारील देश श्रीलंकेत दिसत आहे. येथे जल्लादाच्या २ पदासाठी चक्क १०० जणांनी अर्ज केला आहे. विशेष म्हणजे, श्रीलंकेत जल्लाद पदासाठी ज्या १०० जणांनी अर्ज केले आहेत, त्यात एक अमेरिकन नागरिकाचा देखील समावेश आहे. श्रीलंकेत लवकरच अंमली पदार्थांची विक्री करणाऱ्या तस्करांना फाशी दिली जाणार आहे. त्यासाठी जल्लादांची भरती सुरु करण्यात आली आहे. अर्जदारांची मुलाखत घेऊन त्यांची भरती केली जात आहे. जल्लाद होण्यासाठी ज्या १०० जणांनी अर्ज केला आहे, त्यांचे सुरक्षेच्या कारणास्तव नाव किंवा कोणतीही माहिती जाहीर केली जाणार नाही.

श्रीलंकेतील दोषी गुन्हेगारांना फाशी देण्यासाठी कायदा आहे. पण श्रीलंकेत



१९७६ पासून कुणालाही फाशी दिली गेली नाही. गेल्या पाच वर्षांपासून तर श्रीलंकेतील कुठल्याच तुरुंगात जल्लादाची नेमणूक करण्यात आली नाही. गेल्या वर्षी एका जल्लादाची नेमणूक करण्यात आली होती. पण तो नोकरीवर रुजु झालाच नाही. येत्या दोन महिन्यात अंमली पदार्थांची तस्करी करणाऱ्यांना फासावर लटकवेन अशी घोषणा फेब्रुवारी महिन्याच्या सुरुवातीलाच श्रीलंकेचे राष्ट्रपती मैत्रीपाल सिरिसेना यांनी घोषणा केली होती.

# मिरा–भाईंदरमध्ये सेवन इलेव्हन क्लब या पंचातारांकित क्लबचे मोठ्या थाटात भव्य उद्घाटन

## आज माझे स्वप्न पूर्ण झाले- आमदार नरेंद्र मेहता

















झटपट लोकसंख्येत वाढ होत असलेल्या मुंबई लगत मिरा भाईंदर या महानगर पालिका हद्दीत रोज नवनव्या इमारतीचे जंगल वाढत चालले आहे. यामध्ये मुंबई व इतर राज्यातून लोक स्थलांतर करुन मिरा भाईंदर महानगर पालिका हद्दीत नवीन जागा घेत आहेत. एकेकाळी परिसरात पाणी नाही म्हणून दुर्लक्ष करणारी जनता आता मोठया प्रमाणात येथे स्थलांतर करीत आहे. येथे नियोजनबद्ध टोलेगंज इमारती उभ्या करण्यात आल्या आहेत. त्याचप्रमाणे मैदाने, क्लब मनोरंजनासाठी नाटयगृह निर्माण करण्यात आली आहेत. यामध्ये अजून एक पंचतारीक क्लब स्थानिक आमदार नरेंद्र मेहता यांच्या वतीने व संकल्पनेने उभारण्यात आला आहे. यामध्ये अतिशय सुंदर व आलिशान असे मुलांसाठी प्लेग्राऊंड, बॅडमिंटन कोर्ट



टेबलटेनीस, व्यायामशाळा, तरणतलाव, बॅक्युट हॉल, मिनी थेईटर, हॉटेल रेस्टॉरंट, मिटींग हॉल सभागृह अशा सोयीं नी सुसज्य असे पंचतारीक क्लॅब मिरा भाईंदरची शान उभी राहीली आहे. या क्लबसाठी २००८ साली मुळ परवानगी मिळाली होती. परंतू अनेक विरोधकांनी सदर इमारत बांधणीला अनेकवेळा स्थगीती आणण्यासाठी प्रयत्न केला. पण असो उशीर झाला तरीही माझे सेवन इलेव्हन क्लब आज लोक समर्पण करताना मला खूप आनंद होतो असे आमदार नरेंद्र मेहता यांनी म्हटले आहे. या कार्यक्रमात अनेक कलाकारांनी भाग घेतला ज्यामध्ये जॉनी लिव्हर, महिमा चौधरी, शमिता शेट्टी, दिपीका सिंह आणि आफताब शिवदसानी उपस्थित होते. येथील नागरिकांना मुंबई नगरीची आठवणच येणार नाही अशा पद्धतीचे संपूर्ण महाराष्ट्रातील भव्यदिव्य क्लब आज आमदार नरेंद्र मेहता यांनी मिरा भाईंदर वासीयांना दिला आहे. मी त्यांचे जनतेच्या वतीने हार्दीक स्वागत करते असे महापौर डिंपल मेहता यांनी म्हटले. यापुर्वीच एक आठवडयापूर्वी विधायक नरेंद्र मेहता यांनी मिरा भाईंदर वासीयांना अतिशय भव्य असे सप्तेश्वर मंदीर निर्माण करुन लोकार्पण केले यामध्ये सात प्रसिद्ध धाम चे देवतांच्या मुर्ती स्थापन करण्यात आल्या आहेत.

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं.३-४, अमीन इंडस्ट्रियल इस्टेट, सोनावला क्रॉस रोड नं.४, गोरेगांव (पूर्व), मुंबई - ४०० ०६३ येथे छापून २, राजाराम को.ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर (पूर्व), ठाणे - ४०१ १०५ येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत)